INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# " शिवकालीन गावगाडा : एक अभ्यास "
# (Shivkalin Gavgada: A Study)

**प्रा. डॉ. आर.ए. चव्हाण**
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
E-mail: rchavan1972@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2025-37686619/IRJHIS2404069/April 2024

**प्रस्तावना :**

स्वराज्याची स्थापना महाराष्ट्राच्या इतिहासात एक मोठे स्थित्यंतर झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधीपासून मराठ्यांचा राजकीय प्रभाव सातत्याने वृध्दिंगत होत होता. निजामशाहीत शहाजीराजांनी वजिरपदापर्यंत मारलेली मजल या प्रक्रियेचेच दिग्दर्शन करत होती. १७ व्या शतकात महाराष्ट्रात घडलेल्या या बदलांची महाराष्ट्राचा पुढचा प्रवास निर्धारित केला. या राजकीय बदलाचे परिणाम अपरिहार्यपणे सामाजिक व आर्थिक संस्थावर झालेले दिसतात. या बदलांचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने शिवपूर्वकालिन व शिवकालीन ग्रामीण जीवन, त्यालाच 'गावगाडा' असा शब्द आहे. त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शिवकाळात बहुतांश लोक उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असल्याने सामाजिक व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदु नगर व शहर नसून खेडे हा होता. नागरी ठिकाणी असलेली लोकसंख्या खेड्यात असलेल्या लोकसंख्येपेक्षा कमी होती. छ. शिवाजी महाराजांनी खेड्याची व्यवस्था लावण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली. गाव हा एक सुव्यवस्थित घटक होता. जमिन ही उपजिवीकेचे मुख्य साधन होते. गावावर एकंदरित चार स्तरांचे नियंत्रण होते. पहिला स्तर दिवाणसत्ता, दुसरा गोतसत्ता, तिसरा धर्मसत्ता तर चौथा व्यापारी सत्तेचा होता. यात गोतसत्तेचा स्तर सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा होता. गावगाड्याचे वतनदार, मिरासदार, बलुतेदार व उपरी हे महत्वाचे भाग होते. छ. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्र राज्याच्या विस्ताराबरोबर, एकंदरीत राज्याचा कारभार सुव्यवस्थित चालावा म्हणून अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती करून याचे राजमंडळ निर्माण केले. वंशपरंपराचे अधिकार महाराजांना मान्य नव्हते. स्थानिक राजव्यवस्थेचा राज्याचे, सरसुभे, सुभे, परगणे, तर्फे- महाल, असे विभाग करून चालविली होती.[१]

**अ) वतनदार :**

गावाच्या एखाद्या अधिकाऱ्याला राजसत्तेकडून मिळालेले जमिनीचे दान म्हणजे वतन, ह्या अरबी शब्दाचा वापर महाराष्ट्रात मुसलमानी शासनकाळात सुरू झाला. यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी संपूर्ण गावाची असे. गावकऱ्याकडून रोख रक्कम मिळे, त्याला 'नख्त' असे संबोधले जाई. वस्तुरूपाच्या प्राप्तीला 'गला' या हक्कांचा वतनदाराच्या सनदेत समावेश असल्याने ते त्याचे कायदेशिर अधिकार असावेत या मोबदल्यात 'हकलजिमा' असे म्हणत. तत्कालिन सामाजिक व्यवस्थेत वतनाला अत्यंत

महत्वाचे स्थान होते. राजकीय सत्तेपर्यंत पोहोचण्याचा तो एक प्रभावी मार्ग होता. वतन संस्थेचा हेतू प्रशासकीय विकेंद्रीकरणाचा असल्याने ती अत्यंत आवश्यक अशी संस्था होती. हे निर्विवाद सत्य होय.[२]

**१) पाटील :**

पाटलाला गावाचा राजा असे म्हटले जात असे. राज्यव्यवहार कोशात पाटलाचा उल्लेख 'ग्रामगोपक' असा केला आहे. गावातील शेतीमधील लावणी संचणी व उगवणी ही पाटलाची प्रमुख कामे होती. लागवडीखालील जमीन वाढवणे ही जबाबदारी पण होती. तो गोतसभेचा प्रमुख असे. राजसत्तेच्या अधिकाऱ्यांना पाटलाशी चर्चा केल्याशिवाय शेतसारामध्ये बदल करता येत नसे. गावाचा शेतसारा वसूल करण्याची जबाबदारी पाटलाची होती. गावात शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पाटलाकडे होती. पाटील सामान्यत: मराठा समाजातील तर क्वचित इतर जातीचाही असे. पाटीलकीचे वतन विकता येत नसे. राजसत्तेला एखाद्या व्यक्तीला पाटीलकीचे वतन नव्याने देण्याचा अधिकार होता. गोतसत्तेस देखील पाटील निवडण्याचा अधिकार होता.[३]

**हकलजिमा :** पाटीलकीच्या सनदेत त्याने उपभोगावयाच्या हकलजिमाची नोंद केलेली आहे. हक्क म्हणजे ज्या वस्तु अथवा सेवा पाटलाला हक्काने अथवा कायद्याने स्वीकारता येत त्याला 'लाजिया' या सदराखाली मिळणारी भेट/ सेवा ऐच्छिक स्वरूपात असे. रयतेने दिलेल्या देणग्यांचा यात अंतर्भाव असे, हकलजिमांना पाटलाचे कायदे असेही म्हणत. पाटलाच्या हकलजिमात काही कारणामुळे वाढ झाली असेल तर त्याप्रमाणे सनदेत बदल करून दिला जात असे. पाटलाचा व्यवहार प्रामुख्याने शेतीशी निगडीत असल्याने त्याच्या या हक्कांना नांगराचे हक्क असेही म्हटले आहे. हकलजिमाचे स्वरूप स्थलकालपरत्वे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. याचे स्वरूप कसे होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

**मानपान :** मानपान म्हणजे गावातील सणासुदीच्या अथवा इतर प्रसंगी पाटलाला मिळणारा अग्र हक्क होय. गावाच्या जत्रेचा / उत्सवाचा तो प्रमुख नायक असे. सणाच्या दिवशी गावकऱ्यांकडून होळीची पोळी, भाद्रपदात गणेशाची मुर्ती, मकरसंक्रांतीला तिळगुळाची पोळी तसेच दसरा, दिपावली गुडीपाडवा, नागपंचमी, पोळा व इतर सणाच्या दिवशी त्यांना अनेक भेटवस्तु मिळत.

**खुर्दा/ रोकड :** गावापासून जे निव्वळ उत्पन्न सरकारला मिळत असे त्याचा काही हिस्सा पाटलाला मिळत. हा हिस्सा किती असावा हे सरकार ठरवित होते. पाटीलकीचा हक्क २२% असे दिवाणाने नेमुन दिले होते.

**गला :** प्रत्येक जमीन धारकाकडून पाटलाला काही उत्पन्न मिळत असे 'घुगरी' म्हणजे शेतात पिकणाऱ्या धान्याचा भाग, फसकी म्हणजे कोणतेही पसाभर धान्य इ. गावाचा कारागिर तसेच व्यापाऱ्याकडून पाटलाला काही वस्तु प्रत्येक वर्षी मिळत असत. चांभार त्याचा 'पायपोसी' म्हणजे पादत्राणे, विणकर त्याला 'चोळखण' म्हणजे कपडा, व्यापारी त्याला नारळ, सुपारी, तूप इ. माल विनामूल्य देत असे.

**वेठबिगार :** महार, वाजंत्री व कारागीर यांना पाटलासाठी विनामूल्य काम करावे लागत. एक राबता महार पाटलाच्या तैनातीला असे.

**कर :** गावावर लावलेला सरकारी करांचा काही हिस्सा पाटलाला मिळत असे. स्थूलमानाने उल्लेख केलेला असे. अशा वेळी पाटलाला पूर्ण स्वातंत्र असे. हकलजिमे हे परंपराने आणि रूढीने ठरविले असल्यामूळे ते काय असतात याची कल्पना गावकऱ्यांना होती.[५]

**२) कुलकर्णी :**

कुलकर्णी हा पाटलाचा मदतनिस होता. त्याच्या कामाचे स्वरूप कारकूनी होते. गावाचे दप्तर सांभाळणे त्यात जमिनीचे मोजमाप, वर्णन याचा समावेश असे. गावाचा जमा खर्च तो पाही. महार शेताच्या हद्दीवर व पिकांवर लक्ष ठेवी. सरकारी सारा

भरण्यासाठी तोच जात असे. खेड्याचा वरचा विभाग म्हणजे तर्फे अथवा कर्यात. त्यावर देशमुख असे. प्रत्येक गावात पाटील असे पण कुलकर्णी असेलच असे काही नव्हते. त्याची कारणे सुशिक्षित लोकांचा तुटवडा तसेच गावाचे लहान स्वरूप हे असावे. अनेक वेळा एकच कुलकर्णी अनेक खेड्यांचे काम पाहत असे अशा वेळी कुलकर्णी एखादा मदतनिस ठेवत असे.

**हकलजिमा :** कुलकर्णी व पाटलाचे हकलजिमे यांच्या स्वरूपात फरक नव्हता. तर त्यापासून होणाऱ्या प्राप्तीत फरक होता. दप्तर खर्चासाठी कुलकर्णीला सादिलवार पट्टी म्हणून काही रोख रक्कम गाव व राजसत्ता देत होती. गावकऱ्यांकडून त्याला अनेक वस्तु व सेवा मिळत. मात्र प्रत्येक गावाच्या रूढीप्रमाणे यात फरक पडत असे.[६]

**३) चौगुला :**

गावातील आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे चौगुला. तो वतनदार आहे, बलुतेदार नाही. त्याला 'ग्रामणी' असे म्हटले आहे. मुळ शब्द 'चौकुला' म्हणजे चार कुळे बाळगणारा असावा. पाटलाच्या कामातील सहाय्यक त्यात सारा वसूली, गोतसभेत पाटलानंतरचे स्थान, नांगराप्रमाणे 'काठी' अशी निशाणी दाखविली आहे. जमिनीच्या क्षेत्रमापनाशीही त्यांचा संबंध असावा. गावाचा सारा मुख्य तिजोरीत नेवून भरण्याची जबाबदारी चौगुल्यास पार पाडावी लागत असे. गावात कोठारे, गोदाम याची व्यवस्था बघण्याचे काम त्याच्याकडे होते.

**४) शेटे - महाजन :**

हे गावकीच्या कामात वतनदाराचा वर्ग म्हणजे शेटे - महाजन गावाच्या पेठेचे ते वंशपरंपरागत अधिकारी होते. गावात पेठ वसावयाची असेल तर ते काम यांच्याकडे होते. या कामासाठी त्यांना सरकारकडून जमिन व गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. त्याचे स्वरूप वंशपरंपरागत अधिकाराप्रमाणे होते. पेठेचा हिशोब महाजन ठेवी. गोतसभेच्या कामकाजात अधिकृतपणे भाग घेत असतं. गावात सावकारकीचे व्यवहार शेटे - महाजन करित असत. 'तराजू' ही त्यांची व्यावसायीक निशाणी होती. सरकारी कागदपत्रावर विशेषत: महजरावर त्यांच्या नावासमोर तराजू काढला जाई.

**५) देशमुख व देशपांडे :**

हे परगण्याचे वतनदार अधिकारी होते. अनेक खेड्यांचा मिळून परगणा होत असे. परगण्यातील बहुतेक गावातुन देशमुख - देशपांड्यांची जमिन असल्याने गावाशी त्यांचा निकटचा संबंध होता. देशमुख हा परगण्यातील सर्व पाटलांचा नायक आणि देशपांडे हा सर्व कुलकर्ण्यांचा नायक होता. हे वतने सामान्यत: मराठा समाजाकडे होते. पाटलाच्या कामावर देखरेख ठेवणे हे काम करत दप्तरातील योग्य नोंद घेणे, सरकार व रयत यांना जोडणारा देशमुख हा महत्वाचा दुवा होता. युध्दाच्या वेळी संबंधीत प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी देशमुखाची होती.

**हकलजिमे :** देशमुख हा परगण्याचा अधिकारी असल्याने त्याचे हकलजिमे पाटलापेक्षा विस्तृत होते. अनेक वस्तु विनामुल्य मिळत, रोख रक्कम व दौऱ्याच्या वेळी शिधा देखील मिळत. सरकारी जकातातील २% उत्पन्न देशमुखांना मिळत असे. त्यांच्या तैनातीला एक राबता महार असे.

**६) देशपांडे :**

जे काम देशमुख पाटलांच्या संदर्भात करत असे तेच काम देशपांडे कुलकर्ण्यांच्या संदर्भात करत असतं. त्याचा उल्लेख 'देशकुलकर्णी' असा केला जात होता. या कामासाठी त्याला वतनी जमिन मिळत असे. ती वंशपरंपरागत व सारामुक्त असे. परगण्याचे हिशोब ठेवणे व तपासणे ही त्याची मुख्य जबाबदारी होती.

**हकलजिमे :** देशमुखाला जी हकलजिमे होती त्यात काही फरक नाही. त्यापासून होणाऱ्या प्राप्तीत फरक आहे.

देशपांड्यांची प्राप्ती देशमुखांपेक्षा नक्कीच कमी होती.[७]

**ब) मिरासदार :**

वतनदाराच्या नंतरचा महत्वाचा वर्ग म्हणजे मिरासदार. उत्तर भारतात या वर्गाला 'खुद-काश्त' या नावाने ओळखले जाते. गावाच्या जवळपासच्या ७५-८०% जमिनीवर यांची मालकी होती. सरकाराला ठरलेला शेतसारा जे भरत असतं. गोतसत्तेच्या कामकाजात भाग घेण्याचा त्यांना अधिकार होता. मिरासदार हा तत्कालीन खेड्यातील बहुसंख्य व प्रभावी वर्ग होता. तत्कालीन समाजव्यवस्थेत त्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे होते. मिरासदारांना नागरीकत्वाचे सर्व हक्क उपभोगण्याचा अधिकार होता. ते स्वत:च्या मालकीची जमिन कसतं व त्यांचा नियमाप्रमाणे शेतसारा भरत असतं.

**क) बलुतेदार :**

वतनदार, मिरासदार यांच्यानंतर गावातील महत्वाचा वर्ग म्हणजे बलुतेदार 'बलुता' म्हणजे जो वर्ग गावात विविध प्रकारच्या सेवा पुरवित असे त्या वर्गाच्या उदरनिर्वाहाकरिता गावाने दिलेला मोबदला याबद्दल त्यांना सारामुक्त जमिन असे.

१) **व्यावसायिक व कारागिर :** यांची सेवा अत्यावश्यक सेवेत मोडत. त्यात सुतार, लोहार, कुंभार, धोबी इ. लोकसेवा करतं.

२) **सेवक वर्ग :** या वर्गात महार, मांग, तराळ, रामोशी यांचा समावेश होता. गावाची अनेक कामे करावी लागत. महार हा गावाचा वतनदार सेवक होता. पाडेवार हा गावाचा महार होता तर राबता महार हा पाटील, कुलकर्णी वगैरे वतनदारांच्या तैनातीला असणारा राबता महार होता. तराळ म्हणजे सरकारी निरोप्या होता. मांग व रामोशी यांच्याकडे गुन्हेगारांचा माग काढण्याचे काम होते.

३) **धार्मिक सेवा :** या सेवा अत्यावश्यक सेवा या सदरात न मोडणाऱ्या होत्या. यात मुलाणी, जंगम, जोशी, गुरव यांचा समावेश होता. मुहूर्त काढणे गावाच्या मंदिराची पूजा करणे ही कामे हा वर्ग करत असे. मुलाण्याकडे कसाईपणाचे व गावात मशीद असल्यास तिच्या देखभालीचे काम करत. मुलाण्याला बारा बलुतेदारांमध्ये मिळालेले स्थान म्हणजे मुसलमान समाज येथील मुख्य समाज प्रवाहात होते. या सेवांखेरीज दुय्यम प्रकाराच्या सेवा पुरविण्याचा लोकांचा एक वर्ग गावात होता. या वर्गाला आलुतेदार असे ओळखले जात. सोनार, शिंपी, पखाल्या, तेली, तांबोळी इ. सेवा पुरविणाऱ्यांचा उल्लेख आलुतेदार म्हणून करता येईल. बलुतेदार गावातील महत्वपूर्ण वर्ग होता.

**ड) उपरी :**

गावातील शेवटचा वर्ग म्हणजे उपरी. नावाप्रमाणेच हे गावाबाहेरचे म्हणजेच 'उपरे' लोक होते. उत्तर भारतात अशा लोकांना 'पाहीकश्तकार' असे संज्ञेने ओळखले जात. हे लोक मोलमजूरी करून जगत. हे बाहेरचे असल्याने त्यांना गावाच्या नागरीकत्वाचे अधिकार नव्हते. परंतु यांना काही कारणाने जमिनीची मालकी, हक्क मिळाल्यास त्यांना मिरासदाराचा दर्जा मिळत होत.[८]

**निष्कर्ष :**

१) शिवकालीन आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू खेडे हा होता.

२) शिवकालीन गावगाडा शेतीवर अवलंबून होता.

**सारांश :**

उपरोक्त विवेचनावरून शिवकालीन गावगाड्यात वतनदार, मिरासदार, बलुतेदार व उपरी या चार घटकावर चालत असे.

या गावगाड्यात छ. शिवाजी महाराजांनी काही बदल केला नाही. तर त्यांनी या संस्थेचा स्वराज्याकरिता उपयोग करून घेतला. मराठी सत्ता प्रस्थापिक करित असतांना छ. शिवाजी महाराजांनी अनेक प्रशासकीय स्तरावर अनेक बदल केले. वतनदारीच्या अनेक अनिष्ठ पध्दती काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी नविन वतने दिली नाहीत. परंतू अस्तित्वात असलेल्या वतनदारांची वतने काढुनही घेतली नाहीत. महाराजांना राजकीय बदल घडविणे अपेक्षित होते. सामाजिक नव्हे तत्कालीन व्यवस्था चालु ठेवतांना सामाजहितानूकुल असे बदल केले. ही व्यवस्था जनताभिमूख करण्याचा प्रयत्न केला. केंद्रसत्तेला न जुमानणाऱ्या वतनदारांना कडक शिक्षा ठोठावल्या, प्रसंगी अशा वतनदारांची वतने त्यांनी अनामत केली. वतनदारांच्या स्वतंत्र वृत्तीचा बांधीलकी केंद्रसत्तेशी घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. व ते त्यात यशस्वी झाले. अशा प्रकारे तत्कालीन समाजातील वतनदारीचा महाराजांनी राज्य उभारणीच्या कार्यात उपयोग करून घेतला.

**संदर्भ सूची : -**


१) डॉ. कुलकर्णी अ.रा. आणि खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड-२, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४, पृष्ठ क्र.-२५७

२) डॉ. अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना व केंजळे सौमित्र, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हे. २००८, पृष्ठ क्र. -६६

३) कुमार अमित, मराठों का इतिहास, डिस्कव्हरी पब्लिकेशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २०१०, पृष्ठ क्र.-२००

४) डॉ. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, जुलै २०१२, पृष्ठ क्र.-१०

५) डॉ. अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना व केंजळे सौमित्र (उपरोक्त), पृष्ठ क्र.- ६७

६) प्रा. मार्डीकर मदन, मराठ्यांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स, छ. संभाजीनगर, प्रथम आवृत्ती, जून २००८, पृष्ठ क्र.-४१६

७) डॉ. कुलकर्णी अ.रा., (उपरोक्त), पृष्ठ क्र. -१७

८) डॉ. अत्रे शुभांगना, रायरीकर कल्पना व केंजळे सौमित्र (उपरोक्त), पृष्ठ क्र. -७०